# संविधान आणि शिक्षण

**डॉ. रेणुकादास उबाळे**
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.
भ्र. ९४२३२१७७३८
Email : renukadas1983@gmail.com

---

**सारांश :**

*भारतीय संविधान हे सर्व समावेशकता व सामाजिक उत्थानाचे महत्त्वाचे साधन आहे. भारतीय संविधानाची प्रास्ताविका सर्व भारतीयांना दर्जाची व संधीची समानता देण्याची हमी देते. स्वातंत्र्य काळापासून शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट भारतामध्ये साध्य होऊ शकले नाही. शिक्षा हक्क अधिनियमाने शिक्षणाच्या मूलभूत अधिकारासंबंधी महत्त्वाच्या तरतुदी केल्या होत्या. इ. स. १९९० नंतर शिक्षणाचे वेगाने खाजगीकरण होऊ लागले. कालांतराने शिक्षणाचे स्तरीकरण व बाजारीकरण सुद्धा झाले. राष्ट्रीय शिक्षण धोरणा (२०२०) मध्ये सुद्धा शाळा संकुल सारख्या संकल्पना शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचे हनन करतात. त्यामुळे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या दृष्टीने सर्वांना मोफत दर्जेदार व राज्यवित्तपोषिक शिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे आहे. असे झाल्यासच भारतीय संविधानाला अपेक्षित असलेली सर्वांगीण समता निर्माण होऊ शकते.*

**बीज शब्द :** भारतीय संविधान, शिक्षण, शिक्षणाचा अधिकार, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, सामाजिक समता, शिक्षण हक्क अधिनियम, राष्ट्रीय शिक्षण धोरण, शाळा संकुल, शिक्षणातून समानता.

---

**ओळख :**

सर्वसमावेशकता हे भारतीय संविधानाचे प्राणतत्व आहे. संविधान निर्मितीकरिता भारतातील क्रांतिकारी विचारांचे प्रणेते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची मर्मदृष्टी लाभली. त्यामुळे भारतातील तळागाळातील व्यक्तीच्या मूलभूत अधिकाराचा विचार संविधानामध्ये प्राधान्याने होऊ शकला. स्वतंत्र भारतामध्ये कल्याणकारी राज्याची संकल्पना संविधानाच्या रूपाने तयार झाली. या कल्याणकारी राज्यामध्ये समाजातील प्रत्येकाला प्रगतीचे समान मार्ग व समान संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली. प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय समाज विविध वर्ण-जातींमध्ये विभाजित होता. जातिव्यवस्थेच्या उतरंडीप्रमाणे भारतातील सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठेचे असमान वितरण आपल्याला विविध काळामध्ये सुद्धा पाहायला मिळते. ही उतरंड मोडून समानता प्रस्थापित करायची असेल तर सर्व भारतीयांना एकाच पातळीवर उतरावे लागणार होते. ही समान पातळी कोणती असेल? तर 'शिक्षण' हे त्याचे निर्विवाद असे उत्तर आहे.

भारतीय संविधानाची प्रास्ताविका सर्वपरिचित आहे. या प्रास्ताविकेला संविधानाचे प्राणतत्त्व असे मानले जाते. या प्रस्ताविकेमध्ये भारतीय संविधान भारतातील प्रत्येक नागरिकाला दर्जाची व संधीची समानता प्रदान



Research Hub International Journal

करण्याचे आश्वासन देते. उदात्त मानवी मूल्ये संविधानामध्ये अंतर्भूत असल्यामुळे संविधानाची दृष्टी अधिकाधिक व्यापक आणि सर्वसमावेशक आहे. भारतीय संविधानातील खंड १ मध्ये भारतीयांचे मूलभूत अधिकार दिलेले असून कलम १४ मध्ये कायद्यासमोर सर्व लोक समान आहेत, हे स्पष्ट केले आहे. यासोबतच शिक्षण ही बाब सुद्धा मूलभूत अधिकाराच्या चौकटीत समाविष्ट केली आहे. कलम १९ मध्ये 'प्रतिष्ठा व अस्मितेसह' जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे व शिक्षण मिळणे हे भौतिक गरज आहे, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. याचे विस्तृत स्पष्टीकरण आपल्याला कलम '२१' व '२१ अ' मध्ये आढळते. एवढेच नव्हे तर कलम ४५ व ४६ नुसार ग्रामपंचायतीने जमिनीचे वाटप, पाण्याची सोय, रस्ते बांधणी इत्यादी महत्त्वाच्या कामांसोबत शिक्षण ही जबाबदारी सुद्धा सांभाळावी, असे सांगण्यात आले आहे.

भारतातील सर्वसामान्य लोकांना स्वतंत्र भारताकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. भारत स्वतंत्र झाल्यानंतर समाजामध्ये समता, बंधुता, समानता, न्याय या बाबींची पूर्तता होईल, अशी रास्त अपेक्षा होती. परंतु सर्वसामान्य लोकांचा स्वातंत्र्यानंतर भ्रमनिरास झाला. गरिबी, बेरोजगारी, जातीय विषमता, धार्मिक विषमता, स्त्री-पुरुष असमानता, निरक्षरता अशा असंख्य बाबी स्वातंत्र्यानंतर सुद्धा तशाच टिकून राहिल्या. याच्या अनेक कारणांपैकी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण न होणे, हे सुद्धा एक महत्त्वाचे कारण होते. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची उद्दिष्टे पुढील १० वर्षात पूर्ण केली जातील, अशी योजना होती. परंतु पुढील ५० वर्षानंतरही ते उद्दिष्ट किमान पातळीवर सुद्धा साध्य होऊ शकले नाही. २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण ३५% लोक निरक्षर होते. यातील महिलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण ४६%, अनुसूचित जातीतील लोकांमध्ये ४६% आणि अनुसूचित जमातीतील लोकांमध्ये हे प्रमाण ५१% होते. या काळात देशातील पदवीधरांचे प्रमाण जवळपास १० ते ११ टक्के एवढेच होते. २०११ च्या दरम्यान सुद्धा निरक्षरांची संख्या केवळ २६% पर्यंत कमी झालेली आहे. ज्यामध्ये महिलांचे प्रमाण ३५% एवढे आहे. स्वातंत्र्यानंतर इतका काळ लोटल्यानंतरही शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची ही परिस्थिती विदारक आणि चिंताजनक आहे.

भारतातील जातिव्यवस्था आणि आर्थिक संरचना यांचे निकटचे नाते आहे. एवढेच नव्हे तर जातिव्यवस्था केवळ आर्थिक असमान वितरण करत नाही, तर सामाजिक प्रतिष्ठा, सांस्कृतिक दर्जा व लोकांची मानसिकता सुद्धा ठरवते. सामान्य लोकांची भौतिक गरज म्हणून संपत्तीला अथवा जीवनावश्यक भांडवलाला सुद्धा अत्यंत महत्त्व असते. भारतामध्ये आज देखील संपत्तीचे असमान वितरण पाहायला मिळते. आपल्याकडे नव्याने आलेल्या भांडवलशाहीचे लाभार्थी जातिव्यवस्थेत शीर्षस्थानी असलेल्या जाती ठरल्या. तर भांडवली व्यवस्थेचे बळी सुद्धा कामगार, छोटे शेतकरी व शेतमजूर असलेले निम्न जातीय लोक ठरले. अर्थशास्त्राचे अभ्यासक रणजीत परदेशी यांनी बिहारमधील ग्रामीण जातिरचना नव्या काळातही वर्ग रचनेशी कशी मिळती जुळती राहिली, हे सांगण्यासाठी "रिझर्वेशन अँड क्लास स्ट्रक्चर ऑफ कास्ट"[१] च्या अभ्यासातील आकडेवारी दिली आहे. या आकडेवारीनुसार उच्च जातीयांमध्ये जमीनदार व श्रीमंत शेतकरी असलेल्या लोकांचे प्रमाण ९५.७०% एवढे आहे. उच्च ओबीसी जातींमध्ये हे प्रमाण ३६.४०% एवढे आहे. ओबीसी जातींमध्ये जमीनदार व श्रीमंत शेतकरी असलेल्यांचे प्रमाण ४.२४% एवढे आहे. तर अनुसूचित जातीतील लोकांचे प्रमाण केवळ २.६७% एवढे आहे. याउलट उच्च जातीयांमध्ये शेतमजूर असणाऱ्यांचे प्रमाण १.८४%, उच्च ओबीसी जातींमध्ये हे प्रमाण २६.६५% आहे. ओबीसी जातींमध्ये ८४.७४% तर अनुसूचित जातीतील लोकांमध्ये हेच प्रमाण ९२.७४% एवढे आहे. भारतीय

Research Hub International Journal

जातीरचनेनुसार बिहारमधील हे वास्तव संपूर्ण भारतामध्ये सुद्धा कमी-अधिक प्रमाणात लागू होते. या असमान वास्तवाला स्वतंत्र भारतामध्ये शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण न होणे हा घटक सुद्धा तेवढाच जबाबदार आहे, असे वाटते.

आजपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होऊ शकले नाही. त्यामुळे सर्वांना समान व मोफत शिक्षण प्रदान करणे, हा यावरील उपाय ठरू शकला असता. परंतु भारतामध्ये तसे घडले नाही. आजघडीला राष्ट्रीय शिक्षण धोरण येऊ घातले आहे. या धोरणामध्ये खाजगीकरणाचा उघडपणे पुरस्कार केला आहे. सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेच्या झालेल्या दुरावस्थेची पुरेपूर कल्पना राष्ट्रीय शिक्षण धोरण करताना आहे. कारण या दुरावस्थेचे वर्णन धोरणाच्या मसुद्यामध्येच केले आहे. "यु-डायस २०१६-१७ के आंकडों के अनुसार भारत के २८% सरकारी प्राथमिक स्कूल और १४.८% उच्च प्राथमिक स्कूल मे ३० से भी कम छात्र पडते है| कक्षा १ से ८ तक के स्कूल मे प्रति औसत १४ छात्र है| जबकि बहुत से स्कूलों में तो यह औसत मात्र ६ है| २०१६-१७ मे १,१९,३०३ स्कूल एकल शिक्षक विद्यालय थे इनमे से अधिकांश (९४,०२८) कक्षा १ से ५ वाले प्राथमिक स्कूल थे"[२] असे या मसुद्यात नमूद केले आहे. तरीसुद्धा 'शाळा संकुल' (स्कूल कॉम्प्लेक्स) ही नवी संकल्पना धोरणामध्ये मांडली आहे. या संकल्पनेनुसार अनेक गावातील अनेक शाळा बंद पाडून ३० किलोमीटरच्या अंतरावर एकच शाळा निर्माण करणे, म्हणजे शाळा संकुल होय. २००९ मध्ये 'शिक्षण हक्क अधिनियम' आला होता. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून प्राथमिक शाळा १ किलोमीटर, उच्च प्राथमिक शाळा ३ किलोमीटर व माध्यमिक शाळा ५ किलोमीटरवर असणे बंधनकारक होते. परंतु शाळा संकुल या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांचा हा मूलभूत शिक्षणाचा अधिकार मारला जात आहे. खरे पाहता, राष्ट्रीय शिक्षण धोरण शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन करते. हे शासनाचे असंवैधानिक कृती आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीवर सोयीस्कर पद्धतीने पडदा टाकण्यात आला आहे भारतामध्ये शिक्षणाची गळती मोठ्या प्रमाणात आहे नवीन शिक्षण धोरणात' मल्टिपल एन्ट्री मल्टिपल एक्झिट' या संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. धोरणात म्हटले आहे की, "अभ्यासक्रमाच्या कल्पक व लवचीक रचनेमुळे अभ्यासाच्या विविध शाखांचे व विषयांचे कल्पक मिश्रण निर्माण करणे शक्य होईल आणि विद्यार्थ्यांना अनेक उपयुक्त आगमन व बहिर्गमन मार्ग प्राप्त होतील."[३] खरे पाहता अर्धवट शिक्षणातून कुठलीही ठोस निर्मिती विद्यार्थी करू शकत नाही. हे माहीत असतानाही केवळ विद्यार्थ्यांच्या गळतीवर पडदा टाकण्यासाठी धोरणातील बाबी आखल्या आहेत, असे दिसून येते.

**निष्कर्ष :**

भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार अत्यंत कमी झाला असताना शिक्षणाचे विविध स्तर घडविण्यात आले. आपल्या आर्थिक कुवतीनुसार वेगवेगळे शिक्षण घेण्याचा पायंडा या स्तरीकरणातून पडला आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाचे खुले समर्थन शासन करत आहे. ज्या सरकारी शाळा होत्या त्या बंद पाडण्याचे निर्णय घेतले जात आहेत. हे सर्व घटक भारतीय संविधानाच्या व्यापक दृष्टिकोनाचे व संविधानाच्या मूलभूत चौकटीचे केलेले उल्लंघन आहे. थोडक्यात, भारतीय संविधानानुसार शिक्षण ही सर्वांचीच मूलभूत गरज असल्याने शिक्षणाच्या क्षेत्रात खाजगीकरण, स्तरीकरण, असमानता व व्यावसायीकरण निर्माण करणे हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनैतिक कृत्य ठरते. म्हणूनच, शिक्षणाचा विचार संविधानिक चौकटीत करून सर्वांना मोफत, दर्जेदार व राज्यवित्तपोषित शिक्षण

मिळणे, हीच काळाची गरज आहे.

**संदर्भ :**


- 'रिझर्वेशन अँड क्लास स्ट्रक्चर ऑफ कास्ट', Economic & Political Weekly, 13.6.1990.
- 'राष्ट्रीय शिक्षण नीती २०१९' (मूळ मसुदा), मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार. पृ. क्र. २१८.
- 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९' मसुदा, (मराठी सारांश), मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार. 'शालेय शिक्षण' प्र. २ (इ).


Research Hub International Journal